# Pimpri Chinchwad Police Commissionerate

प्रेस नोट ता.०७/०३/२०२०

## गुन्हे शाखा,युनिट-४, पिंपरी-चिंचवडची कारवाई

**पिंपरी चिंचवड परिसरात दहशत निर्माण करण्यासाठी देशी बनावटीचे पिस्तोल,जिवंत काडतुसे,व पिस्तोल सारखे लायटर जवळ बाळगणारे इसमास गुन्हे शाखा यूनिट-४,पिंपरी चिंचवड कडून अटक,**

दि. ०६/०३/२०२० रोजी गुन्हे शाखा युनिट-४, चे सहा. पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख व पोलीस पथक वाकड हिंजवडी भागात चैनस्नॅचिंग व वाढती घरफोडी चोरी प्रतिबंधात्मक गस्त करीत असताना पथकातील पोलीस नाईक लक्ष्मण आढारी यांना त्यांचे बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक इसम लकी बेकरी समोर, काळेवाडी पिंपरी येथे संशईतरित्या थांबला असुन त्याचेकडे गाठी पिस्तोल आहे.वगैरे मजकुरची माहिती मिळताच सपोनि देशमुख यांनी सदरची माहीती वरीष्ठ पोलीस निरीक्षक मोहन शिंदे यांना कळविली. त्यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाखाली सपोनि अंबरिष देशमुख यांनी स्टाफसह लकी बेकरी समोर, काळेवाडी पिंपरी परीसरात सापळा लावुन त्यास शिताफीने पकडले. सदर इसमाचे नाव गणेश मारुती माळी वय.२६ वर्षे,रा. बाबुराव ढोरे भवन,फ्लॅट नंबर १९, महादेव मंदिराजवळ,जुनी सांगवी पुणे मुळगाव मु.पो.पूस,ता.आंबेजोगाई,जि.बिड असे असुन त्याचे कब्जात मिळुन आलेले एक देशी बनावटीचे पिस्तोल,तिन जिवंत काडतुसे व एक पिस्तोल सारखे दिसनारे लायटर असे सर्व मिळुन कि.रु.२७,५००/- चे जप्त करण्यात आले असुन त्याचे विरुध्द वाकड पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं.२०५/२०२० भारतीय हत्यार कायदा क.३(२५) व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन त्यामध्ये त्यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त मा. श्री. श्रीधर जाधव, गुन्हे-२ यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे,सहा.पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, स.पो.फौ. वासुदेव मुंडे, अदिनाथ मिसाळ, पो.हवा., संजय गवारे, प्रविण दळे, धर्मराज आवटे, नारायण जाधव, दादाभाऊ पवार, शावरसिध्द पांढरे, पो. ना. लक्ष्मण आढारी, मोहमद नदाफ, तुषार शेटे, पो. शि. सुनिल गुट्टे, सुरेश जायभाये, गोविंद चव्हाण, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, तुषार काळे, व सुखदेव गावंडे, यांनी केली आहे. अधिक तपास सहा.पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख हे करीत आहेत.

( मोहन दा.शिंदे )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा,युनिट-४,पिंपरी चिंचवड


गुन्हे शाखा युनिट ४
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय


गुन्हे शाखा युनिट ४ पिंपरी चिंचवड